**शालेय पोषण आहार योजनेंतर्गत खाजगी**
**<u>शाळांमध्ये स्वयंपाकगृहे बांधण्याबाबत.</u>**

# महाराष्ट्र शासन
## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्रमांक- शापोआ-२०१२/प्रक्र ४७५/प्राशि ४
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक- २१ नोव्हेंबर,२०१२

संदर्भ - केंद्र शासनाचे पत्र क्र. ४-१/२०१२-Desk (MDM) दि. ३१/८/२०१२

**शासन निर्णय** :- बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ दि.१ एप्रिल, २०१० पासून लागू करण्यात आला आहे. या अधिनियमानुसार प्रत्येक प्राथमिक शाळेमध्ये (इ.१ ली ते ८वी) भौतिक सुविधा असणे बंधनकारक आहे. या अधिनियमातील तरतूदीनुसार शालेय पोषण आहार योजनेचे अन्न शिजविण्यात येते अशा शाळेमध्ये अन्न शिजविण्यासाठी स्वयंपाकगृह असणे आवश्यक आहे. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ ची अंमलबजावणी दि. ३१/३/२०१३ पर्यंत पूर्ण करणे बंधनकारक आहे. केंद्र शासनाने संदर्भाधिन दि. ३१/८/२०१२ च्या पत्रान्वये राज्यातील ज्या शाळांमध्ये स्वयंपाकगृह उपलब्ध नाही त्या शाळांमध्ये स्वयंपाकगृह बांधण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येणार असल्याचे कळविले आहे. स्वयंपाकगृह बांधकामासाठी केंद्र शासनाकडून ७५% निधी आणि राज्य शासनाकडून २५% निधी असा खर्च करण्यात यावा.

२. शालेय पोषण आहार या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांसाठी स्वयंपाकगृह बांधकामास मान्यता देण्यात आलेली आहे. तथापि, शालेय पोषण आहार योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या खाजगी संस्थांच्या शाळांमध्ये स्वयंपाकगृह बांधकामास अद्याप मान्यता देण्यात आली नव्हती. केंद्र शासनाने खाजगी शाळांनाही स्वयंपाकगृह बांधकामास मान्यता दिलेली असल्याने, खाजगी अनुदानीत शाळांना केंद्र शासनाच्या योजनेनुसार स्वयंपाकगृह बांधकामासाठी केंद्र शासनाचा ७५% हिस्सा एवढा निधी मंजूर होणार आहे. तथापि, उर्वरित २५% हिस्स्यासाठी राज्य शासनाच्या धोरणानुसार खाजगी शाळांना राज्य शासनाकडून निधी देय होत नसल्यामुळे, केंद्र शासनाच्या योजनेप्रमाणे या खाजगी शाळांना स्वयंपाकगृह बांधकामासाठी केंद्र शासनाकडून ७५% निधी मंजूर झाल्यानंतर उर्वरित २५% हिस्सा खाजगी संस्थांनी उपलब्ध करुन द्यावा.

३. सदर स्वयंपाकगृह बांधकामे हे प्लिंथ एरिया नॉर्म्सनुसार खालीलप्रमाणे करण्यात यावी.

| अ.क्र. | शाळेतील विद्यार्थी संख्या (इ. १ ली ते ८ वी पर्यंत ) (पटसंख्येनुसार) | स्वयंपाकगृहाचा प्रकार | क्षेत्रफळ (चौ.मीटर) |
|---|---|---|---|
| १ | १०० पेक्षा कमी | Type "A" | ११.९७ |
| २ | १०० ते २०० | Type "B" | १८.०४ |
| ३ | २०० पेक्षा जास्त | Type "C" | २७.५८ |

४. प्लिंथ एरिया नॉर्म्सप्रमाणे स्वयंपाकगृह बांधकामाचा खर्च हा त्यावेळी अस्तित्वात असणाऱ्या DSR नुसार ठरविण्यात येईल. त्यानुसार खाजगी संस्थाच्या शाळांमध्ये स्वयंपाकगृह बांधकामासाठी प्लिन्थ एरिया नॉर्म्सनुसार संबंधित जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी (प्राथ.) यांचेमार्फत शिक्षण संचालक (प्राथ.), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी १ महिन्याच्या आत खाजगी शाळांच्या संस्थांकडून अर्ज घेऊन शासनास प्रस्ताव सादर करावा.

५. सदर आदेश शासनाच्या संकेत स्थळावर (www.maharashtra.gov.in) प्रसिद्ध करण्यात आले आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

201211231113393921

( ना.उ.रौराळे )
सहसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधानसचिव, मंत्रालय, मुंबई
मा.मंत्री /मा.राज्यमंत्री, शालेय शिक्षण, यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री/ मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व)
मा. मुख्यसचिव, मंत्रालय, मुंबई
शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक), सर्व जिल्हे
सर्व शिक्षणाधिकारी / प्रशासन अधिकारी, सर्व महानगरपालिका/नगरपालिका
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
सर्व मुख्य लेखा परीक्षक
वित्त विभाग , मंत्रालय, मुंबई
माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई (५ प्रती)
शालेय शिक्षण विभाग (अर्थसंकल्प)
निवड नस्ती, प्राशि-४